



# पारनेर दर्शन







वर्ष १ अंक १९७, बुधवार १७ एप्रिल २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# यांचे आजोबा सांगायचे भुईदंडाने पाणी आणू !

## ■ नीलेश लंके यांनी विखेंचा सातबाराच काढला ■ टाकळी ढोकेश्वर येथे जनसंवाद यात्रा



■ स्वाभिमान जनसंवाद यात्रा तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथे पोहचल्यानंतर झालेल्या सभेत नीलेश लंके यांनी मार्गदर्शन केले.

टाकळी ढोकेश्वर : सुदेश आबुज

**पारनेर तालुक्यावर आमचे वर्चस्व आहे असे सांगणारे यांचे आजोबा स्व. बाळासाहेब विखे हे भुईदंडाने पाणी आणू असे प्रत्येक निवडणूकीत सांगायचे. मात्र भुईदंडाने सोडा नळीनेही कधी पाणी आले नाही. गेल्या पन्नास वर्षांपासून विखे परिवाराने जिल्हयातील जनतेला झुलवत ठेवले असल्याचा घणाघाती आरोप नीलेश लंके यांनी केला.**

नीलेश लंके यांची स्वाभिमान जनसंवाद यात्रा मंगळवारी टाकळी ढोकेश्वर येथे पोहचल्यानंतर झालेल्या सभेत नीलेश लंके यांनी विखे परिवारावर घणाघाती आरोप केले.

यावेळी बोलताना लंके म्हणाले, महाविकास आघाडीचे सरकार गेल्यानंतर आपल्या मतदारसंघाला त्रास देण्याचा प्रयत्न केला गेला. आताही सुमारे साडेतिनशे कोटी रूपयांचा निधी रोखला आहे. विरोधकांनी हे लक्षात ठेवावे, मी सोपा नाही, लोकसभेचे मतदान झाल्यानंतर रोखलेला निधी मिळालेला असेल.

यावेळी लंके यांनी विशेषतः त्यांच्या समर्थकांशी संवाद साधला. ते म्हणाले, आपल्या लोकांशी संवाद साधण्यासाठी जनसंवाद यात्रा तालुक्यात आली आहे. मला विधानसभेत पाठविल्यानंतर सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. साडेचार वर्षांच्या कालखंडात सर्वांचे समाधान करू शकलो नसलो तरी संपूर्ण कार्यकाळात रात्रंदिवस परीश्रम घेतले. मतदार संघाला न्याय देण्यासाठी बेंबीच्या देठापासून प्रामणिक प्रयत्न केले. प्रत्येक गावात किमान एक कोटी रूपयांचा निधी देण्याचा प्रयत्न केला. विधानसभेची घडी बसलेली असतानाही लोकसभेसाठी विधानसभेचा राजीनामा दिला. आपण डाव मोडला आता परत घडी बसवायची असल्याचे भावनिक आवाहन लंके यांनी केले.

टाकळी ढोकेश्वरच्या सरपंच अरूणा खिलारी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. मा. सरपंच सुनिता खिलारी, बाळासाहेब गुंड, अशोक घुले, सुवर्णा धाडगे, मोहन रोकडे, ढोकळे गुरूजी, अभिषेक झावरे, प्रकाश गाजरे यांच्यासह टाकळी ढोकेश्वर गटातील कार्यकर्ते, नागरीक यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते.

### भावनिक आवाहन

तालुक्यातील असंतुष्ट आत्मे लोकांची दिशाभुल करण्याचा प्रयत्न करत आहेत त्याकडे दुर्लक्ष करा.आपले भवितव्य आपल्याच हातात आहे. माझा तुमच्यावर व तुमचा माझ्यावर अधिकार आहे. आज आपण अशा ठिकाणी आहोत की आपण झेंडा लावू शकतो, आपले नाव देशात होणार आहे. धोका पत्करून आपण पुढे जात आहोत. समोरचा कडा पार करून झेंडा रोवायचा आहे. तालुक्यातील मायबाप जनतेच्या हाती मताधिक्य आहे. किमान एक लाखांची आघाडी मिळाली पाहिजे. विरोधक इतर तालुक्यात जाऊन तालुक्यात लंके यांना लिड मिळणार नाही असा गैरसमज पसरवत आहेत कारण इतर तालुक्यातही त्यांना प्रतिसाद मिळत नाही.

नीलेश लंके
उमेदवार

### विखे यांचे सुडाचे राजकारण

विखे परिवाराने पाच कुटूंब सोडून कुणाला तालुक्यात ताकद दिली का ? मी कोणत्याही गावात गेलो तरी शंभर दोनशे जिवाभावाचे माणसं गोळा होतात. मी त्यांना थेट नावाने ओळखतो. कोणी काम घेऊन आलो तर तुझ्या गावाचा पुढारी घेऊन ये, तु कोणत्या पक्षाचा आहे याची कधीही विचारणा केली नाही. प्रत्येकास मदत केली. कोणास त्रास होईल असे कधी केले नाही. माझ्यामुळे कोणाचे आयुष्य बरबाद होईल असे कृत्य मी कधीही केले नसल्याचे सांगत विखे हे सुडाचे राजकारण करत असल्याचा आरोप लंके यांनी केला.

### पारनेरात भाजपा नगण्य

विधानसभेला शिवसेनेविरोधात आपण निवडणूक लढविली मात्र निवडणूकीनंतर मी कधीही शिवसैनिकांना त्रास देण्याची भुमिका घेतली नाही. या निवडणूकीत आपण महाविकास आघाडी म्हणून शिवसेना, काँग्रेससोबत आहोत. आपल्या घरात लग्न आहे. कार्यकर्त्यांनी गावात जाऊन आपल्याला विरोध करणारांना चार लोकांच्या नादी लागून आपल्या तालुक्यातील व्यक्तीला विरोध करू नका असे त्यांना समजावून सांगा. १५, २० वर्षांपासून राष्ट्रवादी व शिवसेना या दोनच पक्षांची ताकद आहे. तिसऱ्या पक्षाची ताकद नगण्य आहे, आपली भुमिका सर्वांपर्यंत पोहचवा, आपण मोठी आघाडी घेणार असल्याचे लंके म्हणाले.

### तालुक्याच्या स्वाभिमानाची लढाई

आजवर बाबासाहेब ठुबे, गुलाबराव शेळके यांनी लोकसभेची निवडणूक लढविली. मात्र त्यांना यश आले नाही. आज आपल्या तालुक्याला खासदार होण्याची संधी चालून आली आहे. मतदारसंघातील सर्व तालुक्यात, नगर शहरात आपणास चांगला प्रतिसाद मिळत आहे. मतदारसंघ मोठा आहे. यापुढील काळात ही स्वाभिमानाची लढाई लढताना प्रत्येकाने गावागावांत मोठे मताधिक्य मिळविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आपल्याला १ लाखांच्यावर आघाडी मिळाली पाहिजे. ग्रामपंचायत निवडणूकीप्रमाणे लढा, विजय आपलाच असल्याचे लंके म्हणाले.

### जो हकदार है वही राजा बनेगा !

पाच वर्षापूर्वी आम्ही विखे यांच्यासोबत होतो. नेता म्हणजे जो सर्वांना बरोबर घेऊन जातो. गेल्या पाच वर्षात खासदार आम्हालाही भेटले नाही. आम्हालाच भेटले नाही तर सर्वसामान्यांचे काय ? तीन पिढया झाल्या ते एकच आश्वासन देतात पठार भागाला पाणी देतो. कोणतेही अश्वासन पुर्ण न करता जनतेला झुलवत ठेवण्यात ते धन्यता मानतात. अब राजा का बेटा राजा नही बनेगा, जो हकदार है, वही

राजा बनेगा
किरण ठुबे, कान्हूरपठार

### हेवे दावे दुर ठेवा

सर्वसामान्य जनतेमध्ये राहणारा नेता म्हणून नीलेश लंके यांची ओळख आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी त्यांना आपल्याला लोकसभेत पाठवायचे आहे. नीलेश लंके यांना तालुक्यात लक्ष देण्यास वेळ मिळणार नसल्याने गावोगावच्या कार्यकर्त्यांनी सजग राहून जास्तीत जास्त मताधिक्य मिळविण्यासाठी परीश्रम घ्यावेत. तालुक्यातील एकच उमेदवार असल्याने हेवेदावे दुर ठेऊन एकतर्फी मतदार घडवून आणा.

गंगाराम बेलकर
मा. सभापती

### हेवे दावे दुर ठेवा

आता हे पार्सल उत्तरेत पाठवायचे आहे पैशांचा पाऊस पाडणारे, वाळू चोर, लाकूडचोर खा. डॉ. विखे यांना चालतात, दुसरीकडे नीलेश लंके यांच्या पाठीशी उभे राहणाऱ्यांना ते गुंड म्हणतात. शिक्षकांना निलंबित करतात. तालुक्यातील मतदारांनी आता हे पार्सल उत्तरेत पाठवायचे आहे.

अरूणा खिलारी
सरपंच, टाकळी ढोकेश्वर

### ते युज अ‍ॅण्ड थ्रो वापर करतात

निवडणूकीत हे लोक कार्यकर्त्यांचा, मतदरांचा युज अ‍ॅण्ड थ्रो असा वापर करतात. काल जातेगांव घाटातून जात असताना वाशिम येथील प्रवाशांचे वाहन बंद पडल्याने ते रस्त्यावर उभे होते. त्या प्रवाशांना मदत करून आम्ही पुढे गेलो. माझ्या जागेवर खासदार असते तर दुसरीकडे तोंड करून ते निघून गेले असते असे लंके म्हणाले.

### कामोठयाच्या सभेसाठी रोजाने महिला

नीलेश लंके कामोठयात सभा घेतात म्हणून खासदारांनी कामोठयात सभा घेतली. कामोठयात फक्त नीलेश लंके हे सेलिब्रेटी असतात. त्यांनी मात्र स्थानिक आमदार गोळा करून रोजाने महिला आणल्या. एकविरा देवीला जायचे म्हणून पारनेरहून महिलांना नेण्यात आल्याची टीका बाजार समितीचे उपसभापती बापूसाहेब शिर्के यांनी केली.

### रजपूत करणी सेनेचा पाठिंबा

कोरोना संकटतील अतुलनिय कामगिरीची दखल घेत राजपूत करणी सेनेच्या वतीने या सभेत लंके यांना पाठींबा जाहिर करण्यात आला. महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते दिनेशसिंह जाधव यांनी पाठींब्याचे पत्र लंके यांच्याकडे सुपूर्द केले.

### बदला घेण्याची वेळ आलीय

स्व.बाळासाहेब विखे यांना पारनेर तालुक्याने खासदार केले. गेल्या पन्नास वर्षात विखे कुटूंबाने काय काम केले ? इतक्या वर्षात त्यांच्यासोबत पाच सहा घराणे सोडली तर कोणीही नाही. ज्यांनी जिल्हयाला त्रास दिला त्याचा बदला घेण्याची आता वेळ आली आहे.

ॲड.राहुल झावरे

### टाकळी गटातून सर्वाधिक मताधिक्य

कोणतीही विकास कामे न करता खा. सुजय विखे फक्त हेलीकॉप्टरने फिरले. आपल्या नेतृत्वाने त्यांना जमिनीवर चालायला लावले. टाकळी ढोकेश्वर गटातून लंके यांना सर्वाधिक मताधिक्य देऊ.

सोमनाथ खिलारी
सरपंच, मांडवेखुर्द

### गुलाल घेतला नाही ते टीका करतात

ज्यांनी कधी आयुष्यात गुलाल घेतला नाही ते नीलेश लंके यांच्यावर एकेरी भाषेत टीका करीत आहेत. पारनेर तालुक्यातून लिड घेण्याची भाषा करीत आहेत. त्यांनी हे लक्षात ठेवावे की तालुक्यातील जनता स्वाभिमानी आहे. नीलेश लंके हे एक लाखांहून अधिक मताधिक्य घेणार आहेत.

बापूसाहेब शिर्के
उपसभापती, बाजार समिती

# नीलेश लंकेंच्या सर्वसामान्यत्वाची राज्यात चर्चा!

## स्वाभिमान जनसंवाद यात्राही कित्येकांना भावली

पारनेर : नाना करंजुले

**लोकसभेच्या निवडणुकीची धामधूम सध्या सर्वत्र सुरू आहे. प्रत्येक मतदारसंघातील लगबग सुरू असली तरी सध्या महाराष्ट्रामध्ये एकाच उमेदवाराची जोरदार चर्चा आहे. ते म्हणजे नगर दक्षिणमध्ये मैदानात उतरलेले नीलेश लंके होय. साधेपणा, आणि सर्वांना कायम उपलब्ध होणारा लोकप्रतिनिधी व कोरोनात केलेल्या कामामुळे लंकेच्या सर्वसामान्यत्वाची जोरदार चर्चा सुरू आहे. त्यातच गेल्या पंधरा दिवसांपासून त्यांनी काढलेली स्वाभिमानी जनसंवाद यात्रा अनेकांना भावली आहे. त्यामुळे त्यांचा विजय सहज होईल अशा प्रकारच्या भावना सर्वत्र व्यक्त केल्या जात आहे.**



पारनेर दर्शन परखड

सात टप्प्यांमध्ये देशात लोकसभेची निवडणूक होत आहे. त्यानुसार त्या त्या मतदारसंघांमध्ये जोरदार तयारी सुरू आहे. पहिल्या टप्प्यामध्ये प्रचार शिगेला पोहोचला आहे. आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या आहेत. परस्परांवर टीकास्त्र सोडण्यासाठी एकही संधी विरोधक सोडत नाहीत. एकंदरीतच लोकसभेचा धुराळा उडण्यास सुरुवात झाली आहे. महाराष्ट्रातही काही मतदारसंघांमध्ये हाय व्होल्टेज लढती पहावयास मिळणार आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने बारामतीचा समावेश आहे. सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार नणंद भावजई असा सामना येथे रंगणार आहे. त्याचबरोबर सध्या संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघांमध्ये केंद्रित झाले आहे. या ठिकाणी प्रस्थापित असणाऱ्या विखे पाटील कुटुंबीयांना विरोधात एका सर्वसामान्य घरातील उमेदवाराने म्हणजेच नीलेश लंके यांनी रणशिंग फुंकले आहे.

अहमदनगरच्या राजकारणामध्ये गेल्या ५० वर्षांपासून विखे पाटील कुटुंबीयांचे वर्चस्व आहे. त्यांना शाळा मास्तरचा मुलगा असलेल्या लंके यांनी आव्हान दिले आहे. डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासारख्या मोठ्या घराण्यातील उमेदवाराविरोधात नीलेश लंके टिकतील का अशा प्रकारचा सवाल उपस्थित केला गेला होता. अर्थात विखे पाटलांची एकूण राजकारण पाहता अशा प्रकारच्या अटकळ लावणे हे स्वाभाविक होते. परंतु लंके यांच्या पाठीमागे ही गेल्या साडेचार वर्षांमध्ये आमदार म्हणून केलेल्या कामाची पुण्याई आहे. त्याचबरोबर लोकांसाठी स्वतःला वाहून घेणे हा त्याग त्यांच्या पथ्यावर आहे. या व्यतिरिक्त कोरोनात केलेलं दैवी काम सुद्धा त्यांच्यासाठी जमेची बाजू आहे. त्यांची राज्यामध्ये कमालीची मोठी क्रेझ आहे. या सर्व पार्श्वभूमीवर राजकारणाचे माहेरघर असणाऱ्या नगर जिल्ह्यामध्ये नीलेश लंके आव्हानाला आव्हान करून सामोरे गेले आहेत. त्यामुळे या मतदारसंघांमध्ये हाय व्होल्टेज फाईट होणार हे जवळपास निश्चित झाले आहे. मात्र लंके यांनी एका मोठ्या राजकीय घराण्याला दिलेली टक्कर हा राज्यासाठी एक कुतूहलाचा विषय ठरत आहे. या निवडणुकीचा निकाल जो लागेल तो लागेल. नीलेश लंके यांचा लढाऊ बाणा हे या लोकसभा निवडणुकीचे एक वैशिष्ट्य राहील हे सांगण्यासाठी कोणा भविष्यवेक्त्याची आवश्यकता नसल्याचे मत राजकीय जाणकार नोंदवित आहेत.

### साधेपणा आणि ग्रामीण ढंगाची जादू!

नीलेश लंके यांचे साधेपणा, चालण्या बोलण्यात आणि वागण्यात असणारी नम्रता, सर्वसामान्यांमध्ये मिसळून समरस होणारं नेतृत्व हे अहमदनगर दक्षिण बरोबर संपूर्ण महाराष्ट्राला भावत आहे. त्याचबरोबर त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील जो ग्रामीण ढंग आहे; त्यांची जादू जनमानसांवर झाल्याचे एक प्रकारे दिसून येत आहे.

### ओट और नोट भी!

निवडणुका म्हटलं की उमेदवाराला मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. कार्यकर्त्यांबरोबरच सर्वांना सांभाळावे लागते काही ठिकाणी पाण्यासारखा पैसा ओतावा लागतो. परंतु नगर दक्षिण मधील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार निलेश लंके यांना जनसंवाद यात्रेमध्ये सर्वसामान्य मतदार मतदान करण्याची ग्वाही देत आहेतच. त्याचबरोबर निवडणूक खर्चासाठी ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात लोकवर्गणीही त्यांना दिली जात आहे. त्यामुळे ओट और नोट भी या पॅटर्नची चर्चा सध्या जोरदार सुरू आहे.

### जनसंवाद यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद!

आमदार नीलेश लंके यांनी गेल्या पंधरा दिवसांपासून जनसंवाद यात्रेला सुरुवात केली आहे. त्याचे नियोजन संपूर्ण नगर दक्षिणमध्ये करण्यात आले आहे. रात्रीचं मंदिरात किंवा मंगल कार्यालयामध्ये सर्वांचे बरोबर जमिनीवर झोपून आपण सुद्धा सर्वसामान्यच आहोत अशा प्रकारचा प्रत्यय नीलेश लंके आपल्या कृतीतून नेहमीप्रमाणे देत आहेत. त्यामुळे त्यांनी काढलेल्या या यात्रेला सर्वत्र उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. मध्यरात्री सुद्धा त्यांच्या स्वागतासाठी लोक जमत असल्याने एक प्रकारे परिवर्तनाची ही नांदी असल्याचे मत राजकीय विश्लेषकांनी व्यक्त केले आहे.


Sanskar Pratishthan's

**DBM English Medium School** STATE BOARD

**DBM International School** CBSE PATTERN

**REQUIRED TEACHERS 2024-25**



We are looking for **Passionate experienced / Fresher, innovative and qualified teachers** with good communication skills and fluency in English for following Classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No. of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre- Primary | H.S.C./ Graduate/ D.Ted | 5 |
| 2 | Primary | H.S.C./ Graduate/ D.Ted / B.Ed. | 4 |
| 3 | Math's | B.sc/ M.sc/ B.Ed. | 2 |
| 4 | Science | B.sc/ M.Sc. B.Ed. | 2 |
| 5 | STT | B.A./M.A. B.Ed / ( His/ Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A. B.Ed | 1 |
| 7 | Marathi | B.A./M.A. B.Ed | 1 |
| 8 | Hindi | B.A./M.A. B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Computer Knowledge | 1 |

**Walk – in Interview with all original documents On Thursday 25 April 2024, 10.00 AM to 3.00 PM at Above Address**

Note: *Salary commensurate based on Skill, qualification and Experience.
* Bus Facility will be provided.
* Training will be provided to fresher candidate who are passionate about Education.

A/P-Ralegan Siddhi,Tal.Parner,Dist.Ahmednagar
P.H. 7666120168,9422755191,7083758198

# प्रगतीमंत्र

## फ्रेशर आहात?



**सध्याच्या स्पर्धात्मक जगात नोकरी शोधणे हे खूप मोठे आव्हान आहे. अशात फ्रेशर म्हणून नोकरी शोधणे आणखी कठीण वाटू शकते. कोणताही अनुभव नसताना फक्त शिकण्याच्या जिद्दीवर नोकरी मिळणे अनेकदा अशक्य वाटू शकते. अशावेळी स्पर्धेच्या या जगात स्वत:चे कौशल्य ओळखून त्यानुसार आपली प्रोफाइल तयार करणे अत्यंत गरजेचे आहे. आज आपण काही खास टिप्स जाणून घेणार आहोत. या टिप्सच्या मदतीने तुम्ही आत्मविश्वासाने फ्रेशर म्हणून नोकरीच्या जगात प्रवेश मिळवू शकता.**

- आकर्षक रेझ्युम तयार करा : आपल्या देशात नोकरी शोधणाऱ्यांची संख्या लाखोंच्या घरात आहे. अनेकदा एकाच नोकरीच्या पदासाठी हजारो लोक अर्ज करतात. अशावेळी आपला रेझ्युमे पाहून आपल्याला त्या पदासाठी पात्र ठरवले जाते. नियुक्ती करणारी व्यक्ती ३० सेकंदापेक्षाही कमी वेळामध्ये रेझ्युम बघतात. त्यामुळे आपला रेझ्युम आकर्षक असणे खूप गरजेचे आहे. रेझ्युम हा आपल्या शिक्षण आणि कौशल्यांचाहा एक स्नॅपशॉट आहे.
- इंटर्नशिप करा : फ्रेशरला अनुभव नसतो. त्यामुळे त्यांना नोकरी मिळणे अनेकदा कठीण जाते. पण अशावेळी फ्रेशर लोकांसाठी इंटर्नशिप फायद्याची ठरू शकते. इंटर्नशिपमध्ये तुम्ही चांगले ज्ञान मिळवू शकता त्यामुळे जास्तीत जास्त इंटर्नशिप करणे गरजेचे आहे. इंटर्नशिपच्या जोरावर तुम्ही चांगला जॉब मिळवू शकता.
- नोकरी शोधण्यासाठी जॉब पोर्टलचा वापर करा : आज जॉब पोर्टलद्वारे नोकरी शोधणे, खूप सोपी झाले आहेत. ऑनलाईन सर्च केल्यावर कित्येक जॉब पोर्टल तुमच्या समोर येतील. या पोर्टलवर तुम्हाला सहज नोकरी मिळू शकते. जॉब पोर्टलवर तुम्हाला मनाप्रमाणे चांगली नोकरी, चांगली कंपनी आणि चांगला पगार मिळू शकतो.
- कौशल्यांवर भर द्या : अनेकदा नोकरी मिळवताना शिक्षणाशिवाय तुमची कौशल्ये कामी पडू शकतात. तुमची क्षमता, संवाद कौशल्य, समस्या हाताळण्याची तुमची पद्धत इत्यादी गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. याशिवाय नोकरी शोधताना सॉफ्ट स्किल सुद्धा महत्त्वाच्या आहेत. प्रत्येक क्षेत्रात सॉफ्ट स्किल्सला खूप मागणी आहे. यासाठी फ्रेशर्सनी इंटर्नशिप, ऑनलाईन कोर्सेस द्वारे सॉफ्ट स्किल आत्मसात कराव्यात.
- मुलाखतीसाठी चांगली तयारी करा : अनेकदा आपला रेझ्युम निवडला जातो पण मुलाखतीची वेळ येते तेव्हा आपल्याला यश मिळवता येत नाही आणि आपण चांगली नोकरीची संधी गमावतो. त्यासाठी मुलाखतीची तयारी करणे गरजेचे असते. तुम्ही ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाविषयी किंवा तुमच्या क्षेत्राशी संबंधित प्रश्न विचारले जाऊ शकतात.त्यानुसार मुलाखतीची पूर्वतयारी करावी.

## पीसीबी अन् पीसीएम...

**दहावी सुरू असतानाच विद्यार्थ्यांना चिंता असते ती म्हणजे पुढे नेमके काय करायचे. अशावेळी पालकांचे आणि अनेकांचे म्हणणे असते की विज्ञान शाखेत प्रवेश घ्यायचा, जेणेकरून करिअरचे सर्व पर्याय खुले राहतात. पण नेमके ते पर्याय कोणते, विज्ञान शाखेत काय शिकावे लागते याविषयी त्यांना विस्तृत माहिती नसते. म्हणूनच त्याविषयी समजून घेणे गरजेचे आहे....**



आपल्याकडे कला आणि वाणिज्य शाखेपेक्षा विज्ञान शाखेला विशेष महत्व दिलेले आहे. कारण या शाखेतून शिक्षण घेतल्यावर करिअरचे जवळपास सगळेच पर्याय खुले होतात. प्रामुख्याने दहावीनंतर विज्ञान शाखा निवडल्यानंतर विद्यार्थ्यांना पीसीबी किंवा पीसीएम या पैकी एक ग्रुप निवडावा लागतो. पीएसबी म्हणजे भौतिकशास्त्र, रसायनशस्त्र आणि जीवशास्त्र (Physics Chemistry Biology) आणि पीसीएम म्हणजेच भौतिकशास्त्र, रसायनशस्त्र आणि गणित (Physics Chemistry Mathematics). विशेषतः दोन्ही ग्रुप जीवशास्त्र आणि गणित या दोन विषयांमध्ये विभागले गेले आहेत.

साधारणपणे ज्यांना वैद्यकीय सेवेशी निगडीत करिअर करायचे आहे ते पीसीबी ग्रुप निवडतात तर ज्यांना अभियांत्रिकी आणि अन्य पर्याय निवडायचे आहेत ते गणित पीसीएम ग्रुप निवडतात. आपल्याकडे विज्ञान शाखेचे सर्व शिक्षण इंग्रजी भाषेतून उपलब्ध आहे.



### असे आहेत पर्याय....

#### पीसीबी ग्रुप निवडल्यानंतर...


- बीएससी/एमएससी
- एमबीबीएस
- बीएचएमएस - होमिओपॅथी डॉक्टर
- बीएएमएस - आयुर्वेदिक डॉक्टर
- बीडीएस - दंतशल्य चिकित्सक
- पशुवैद्यकीय डॉक्टर
- बॅचलर ऑफ फिजिओथेरपी
- इंटिग्रेटेड एमएससी
- बीस्सी नर्सिंग
- बॅचलर ऑफ फार्मसी
- जैवतंत्रज्ञान
- प्रयोगशाळा तंत्रज्ञ
- पॅरामेडिकल कोर्स
- पर्यावरण विज्ञान
- संगणकीय विज्ञान
- एमएस्सी मायक्रो बायोलॉजी
- शिक्षक / प्राध्यापक
- गृहविज्ञान
- मीडिया आणि पत्रकारिता
- हॉटेल मॅनेजमेंट

#### पीसीएम ग्रुप निवडल्यानंतर

- बीएससी/एमएससी
- बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन
- अभियांत्रिकी अभ्यासक्रम
- संरक्षण खात्यातील शासकीय नोकऱ्या
- बॅचलर ऑफ लॉ
- शिक्षक/ प्राध्यापक
- हॉटेल मॅनेजमेंट
- संगणक हार्डवेअर
- वेब डिझायनिंग
- ग्राफिक डिझायनिंग
- सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट
- डेटा सायन्स
- पर्यावरण विज्ञान
- ट्रॅव्हल अँड टुरिझम मॅनेजमेंट
- मीडिया आणि पत्रकारिता
- सोशल वर्क पदव्युत्तर पदवी
- फॅशन डिझायनिंग कोर्स

## बारावीची परीक्षा संपली, पुढे काय?


दहावी, बारावीची परीक्षा संपते न संपते तोवर नातेवाईक मग आता पुढे काय करायचं ठरवलंय? असा प्रश्न घेऊन समोर उभे राहतात. परीक्षेच्या अभ्यासाचा, त्यात चांगले गुण मिळवण्याचा ताण शेवटचा पेपर लिहून झाल्यावर संपलेला असतो. मात्र, पुढे आपण कोणत्या क्षेत्रात करियर करायचे असा मोठा गहन प्रश्न विद्यार्थ्यांसमोर उभा राहतो. अशा वेळेस विद्यार्थ्यांना त्यांना नेमके काय करायचे आहे हे समजत नसल्याने गोंधळलेले असतात. अशात अनेक जण आपल्या मित्राने अमूक क्षेत्र निवडले म्हणून आपणही तेच करू किंवा स्वतः कोणताही विचार न करता घरचे सांगतील त्या क्षेत्राची निवड करतात. मात्र, गोंधळून किंवा इतरांचे ऐकून घेतलेल्या निर्णयांचा त्रास भविष्यात तुम्हाला होऊ शकतो. असे होऊ नये म्हणून, तसेच तुम्हाला योग्य त्या दिशेने वाटचाल करण्यासाठी आधी स्वतःला ओळखणे गरजेचे असते. आता हे कसे करायचे? तर तुम्हाला कोणत्या क्षेत्रात काम करायचे आहे हे ठरविण्याआधी काही गोष्टींवर विचार करून पाहा. त्यानंतर तुमच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करा. यासाठी सुचवलेल्या काही टिप्स वाचा...



- तुमच्या आवडी-निवडी, छंद ओळखा : तुम्हाला ज्या गोष्टींची, विषयांची आवड आहे, त्याच्या अनुरूप असलेले क्षेत्र निवडण्याचा सल्ला दिला जातो. त्यामुळे परीक्षेनंतर सर्वात पहिले तुमच्या आवडीनिवडींची, छंदांची एक यादी तयार करा. त्यानुसार करियरचे विविध पर्याय शोधून ठेवा आणि त्यानंतर इतर पर्यायांचा विचार करा. करियरचे क्षेत्र नक्की करण्यासाठी व्यक्तिमत्त्व चाचण्या, करियर असेसमेंट यांसारख्या साधनांचा वापर करूनदेखील विद्यार्थी स्वतःच्या आवडीनिवडींना प्राधान्य देऊ शकतात. एकदा क्षेत्राची निवड झाली की त्याबद्दल अजून थोडा अभ्यास करावा. या अभ्यासात तुम्ही निवडलेल्या क्षेत्रांमधल्या नोकरीच्या संधी, पगार, शिक्षणाची अपेक्षा, तसेच जॉब मार्केटमधील त्यांची मागणी इत्यादी गोष्टींवर लक्ष द्यायला हवे.
- तुमचे कौशल्य, कमतरता आणि सामर्थ्य ओळखा : कोणतेही क्षेत्र निवडण्याआधी तुमच्यातील क्षमता ओळखणे अवघड असते. मात्र, सुरुवातीपासूनच स्वतःतील सामर्थ्य आणि कौशल्य ओळखल्यास त्याचा फायदा तुम्ही निवडलेल्या क्षेत्रांमध्ये तुम्हाला करता येऊ शकतो. तसेच, स्वतःमधील कमतरता ओळखणे हेदेखील कोणत्याही क्षेत्रात पुढे जाण्यासाठी, प्रगती करण्यासाठी महत्त्वाचे ठरते.
- नेटवर्क वाढवणे : नोकरीसंदर्भात माहिती देणारे, क्षेत्र निवडण्यासाठी किंवा नोकऱ्यांसंदर्भात मदत करणाऱ्या विविध साईट उपलब्ध असतात. त्यांचा उपयोग करून तुमचे नेटवर्क वाढवण्याचा प्रयत्न करावा. तसेच, बारावीनंतर विद्यार्थ्यांनी काय करावे, करियर कसे निवडावे या संदर्भातील मेळावे वगैरे होत असतात; अशा ठिकाणी जाऊनही तुम्ही माहिती मिळवून तुमचे संपर्क वाढवू शकता.

### तज्ञांची मदत घ्यावी

तुम्हाला जर केवळ डिजिटल माहितीवर अवलंबून राहायचे नसेल, तर क्षेत्र निवडण्यासाठी तज्ञांची मदत घेऊ शकता. यासाठी तुम्ही करिअर समुपदेशक, शैक्षणिक सल्लागार, शिक्षक सदस्य किंवा कुटुंबातील आणि मित्रांकडून मार्गदर्शन घेऊ शकता. तुम्हाला कोणतेही प्रश असतील, शंका असल्यास तज्ञ त्या शंकांचे निराकरण करून तुम्हाला मार्गदर्शन आणि सल्ला देतात. थोडक्यात सांगायचे झाले तर बारावीच्या परीक्षेनंतर सर्वात पहिले 'आता मला पुढे काय करायचे आहे?' असा प्रश्न स्वतःला विचारा. त्यानुसार विविध क्षेत्रांची, त्यातील नोकऱ्यांची माहिती करून घ्या. स्वतःच्या कलागुणांची, आवडीनिवडींची, स्वतःतील कमतरतेची पारख करा. अधिक आणि योग्य मार्गदर्शनासाठी तज्ञांची किंवा कुटुंबीयांची मदत घ्यावी. तसेच सतत सतर्क राहून विविध ठिकाणांहून मुबलक माहिती गोळा करा.



## TCS मध्ये होणार पदवीधर उमेदवारांची भरती

**टीसीएस कंपनीत नोकरी शोधणाऱ्या उमेदवारांसाठी सुवर्णसंधी आहे. TCS BPS 2024 द्वारे पदवीधरांसाठी भरती मोहीम आयोजित केली आहे. कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील पदवीधरांसाठी ही भरती होणार आहे. भरती इच्छुक उमेदवार १४ एप्रिल २०२४ पूर्वी नोंदणी करू शकतात... जे विद्यार्थी TCS BPS भरतीसाठी अर्ज करण्यास इच्छुक आहेत,**

पुढील वेबसाईटवर नोंदणी करणे अनिवार्य आहे : https://nextstep.tcs.com/campus/#/

- १ TCS नेक्स्ट स्टेप पोर्टलवर लॉगऑन करा.
- २ वैयक्तिक तपशील भरा. आधार क्रमांक, आधार कार्ड नुसार नाव, आधार कार्डानुसार जन्मतारीख. या गोष्टी भरणे अनिवार्य आहे. कृपया तपशील कोणत्याही त्रुटीशिवाय माहिती भरल्याची खात्री करा आणि अर्ज सबमिट करा. चुकीचा तपशील जमा केल्यामुळे तुमचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.
- ३. नोंदणी : TCS BPS भरती प्रक्रियेसाठी अर्ज करा. जर तुम्ही नोंदणीकृत युजर असाल, तर कृपया लॉग इन करा आणि अर्ज भरा. अर्ज जमा केल्यावर, कृपया Apply for Drive वर क्लिक करा. तुम्ही नवीन युजर असल्यास, कृपया आता नोंदणी क्लिक करा. BPS म्हणून श्रेणी निवडा आणि तुमचे तपशील भरा. तुमचा अर्ज सबमिट करा आणि Apply for Drive वर क्लिक करा. शैक्षणिक तपशील, इंटर्नशिप, कामाचा अनुभव, असल्यास TCS अर्जामधील तपशील पूर्ण आणि अचूक असल्याची खात्री करा.
- ४. तुमचा चाचणी पद्धत(इन-सेंटर) निवडा आणि तुमचे पसंतीचे चाचणी केंद्र निवडा आणि नंतर Apply वर क्लिक करा. कृपया लक्षात ठेवा, एकदा निवडलेले परीक्षा केंद्र बदलले जाऊ शकत नाही.
- ५. तुमच्या अर्जाचा स्टेटस जाणून घेण्यासाठी 'Track Your Application' तपासा. स्थिती 'Applied for Drive' म्हणून दिसली पाहिजे. अर्जाची लिंक : https://www.tcs.com/careers/india/tcs-bps-fresher-hiring-2024

### मदतीसाठी येथे संपर्क साधा

कोणत्याही मदतीसाठी, कृपया TCS TAG हेल्पलाइन टीमशी संपर्क साधा. ईमेल आयडीः tcsbps.support@tcs.com | टोल-फ्री हेल्पलाइन क्रमांकः १८००२०९३१११




### महत्त्वाची सूचना

कृपया लक्षात घ्या की ही केंद्रामध्ये घेतली जाणारी परीक्षा आहे. संबंधित केंद्रांमधील जागांचे वाटप 'प्रथम-येणाऱ्या प्राधान्य' या तत्त्वावर केले जाईल आणि त्यामुळे तुमची पसंती चाचणी केंद्र निवडण्यासाठी लवकरात लवकर नोंदणी करणे आणि अर्ज करणे महत्त्वाचे आहे. एकदा जागा भरल्यानंतर पसंतीच्या शहराची निवड प्रतिबंधित केली जाईल (आधीच जागा भरल्या असल्यास तुम्ही तुमचे पसंतीचे शहर निवडू शकणार नाही). तुमच्याकडे सर्व मूळ शैक्षणिक दस्तऐवज (मार्कशीट्स, पदवी प्रमाणपत्र, इंटर्नशिप लेटर, कार्यानुभव पत्र असल्यास) असणे आवश्यक आहे. चाचणीशी संबंधित संवाद TCS iON – Our Test Provider द्वारे तुमच्याशी शेअर केला जाईल. TCS Gmail, Rediff mail, Yahoo Mail, Hotmail आदीसारख्या अनधिकृत ई-मेल आयडींवरून नोकरीच्या ऑफर/नोकऱ्याशी संबंधित कोणतेही माहिती पाठवत नाही. TCS उमेदवारांना भरती प्रक्रियेसाठी किंवा नोकरीच्या ऑफरसाठी कोणतेही पैसे जमा करण्यास सांगत नाही. TCS कोणत्याही बाह्य एजन्सी/कंपनीशी कोणत्याही मुलाखती घेण्यासाठी किंवा नोकरीच्या ऑफर देण्यासाठी संबद्ध नाही.

## ED त नोकरी करायची?

**सध्या ईडीच्या कारवायांची चर्चा जास्त होत असते. ईडी अर्थात अंमलबजावणी संचालनालयात (Enforcement Directorate) नोकरीच्या शोधात असलेल्यांसाठी ही एक उत्तम संधी आहे. ईडीने उपसंचालक ते ड्रायव्हर या पदांसाठी रिक्त जागा जाहीर केल्या आहेत. ज्या उमेदवारांकडे या पदांशी संबंधित पात्रता असणे आवश्यक आहे. ते ईडीच्या अधिकृत वेबसाइट, enforcementdirectorate.gov.in वर अर्ज करू शकतात. या ईडी भरतीसाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे विलंब न लावता त्वरित करा अर्ज. ईडीच्या या भरतीप्रक्रियेंतर्गत अनेक पदे भरली जाणार आहेत. यासाठी अर्ज करण्यास इच्छूक उमेदवार १६ एप्रिल किंवा त्यापूर्वी अर्ज करू शकतो. जर तुम्हाला इडीमध्ये अधिकारी व्हायचे असेल तर दिलेल्या गोष्टी काळजीपूर्वक वाचून अर्ज करू शकता.**

- पात्रता आणि वयोमर्यादा : इडीमध्ये या पदांसाठी अर्ज करण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांकडे अधिकृत अधिसूचनेमध्ये दिलेली संबंधित पात्रता असणे आवश्यक आहे. त्यानंतरच ते अर्ज करण्यास पात्र मानले जातील. याचबरोबर वयोमर्यादेशी संबंधित सर्व तपशील अधिसूचनेत पाहता येतील.




- निवड झाल्यावर मिळणारे वेतन : या ईडी भरती अंतर्गत कोणते उमेदवार निवडले जातील, त्यांना वेगवेगळ्या पदांसाठी वेगवेगळे वेतन दिले जाईल. उमेदवारांना पदानुसार १,५१,००० रुपयांपर्यत पगार मिळू शकतो.
- अशा प्रकारे ईडीमध्ये निवड होईल : अंमलबजावणी संचालनालय (ED) भरती अधिसूचना आणि अर्जाचा फॉर्म अधिकृत वेबसाइट enforcementdirectorate.gov.in वर उपलब्ध आहे. चाचणी/मुलाखतीच्या आधारे ईडीची निवड केली जाईल आणि निवडलेल्या उमेदवारांची दिल्लीत नियुक्ती केली जाईल. या पदांवर निवड झालेल्यांना एपीजे अब्दुल कलाम रोड, नवी दिल्ली, ११००११ दिल्ली येथे काम करावे लागेल.

## शॉर्ट न्यूज

### राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत सात विद्यार्थी चमकले

**शेवगाव :** राज्यभरात दरवर्षी मंथन प्रकाशनच्या वतीने राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षा घेण्यात येते. या परीक्षेची गुणवत्ता यादी शेवगाव तालुक्यातील हातगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे सात विद्यार्थी केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत चमकले आहेत. हातगाव शाळेच्या इयत्ता तिसरीतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. शेवगाव तालुक्याच्या केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीत सृष्टी घनश्याम कासुळे हिने २६८ गुण मिळवत पहिले, अयोध्या संजय सुपेकर व विपुल विष्णू वाघमारे यांनी २५८ गुण मिळवत दुसरे, अंजली नीलेश ढाकणे हिने २५२ गुण मिळवत तिसरे.

### निकृष्ट दर्जाच्या रस्त्याच्या कामाची चौकशी करा

**श्रीगोंदा :** टाकळी कडेवळी रस्ता दुरुस्तीचे चालू असलेले काम निकृष्ट दर्जाचे असून रस्त्याच्या कामाची चौकशी करत संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी संभाजी ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष नाना शिंदे यांनी केली आहे. श्रीगोंदा ते टाकळी साडेआठ किलोमीटरचे रस्त्याचे काम २०१८ साली एस एस कंट्रक्शन केले होते. या रस्त्याची देखभाल दुरुस्ती पाच वर्ष करण्यासाठी त्यांना बंधनकारक होते. सात किलोमीटर अंतरामध्ये अतिशय खराब अवस्था झालेली होती. त्यामुळे मशीनद्वारे पॅच काढावेत अशी मागणी करण्यात आली होती.

### अल्पवयीन मुलीचे राहत्या घरातून अपहरण

**राहुरी :** १५ वर्षे ६ महिने वय असलेली अल्पवयीन मुलगी ही राहुरी तालुक्यातील रामपूर परिसरात तिच्या कुटुंबासह राहते. दुपारच्या दरम्यान पिढीत मुलगी ही तिच्या राहत्या घरातून अचानक बेपत्ता झाली. तीच्या नातेवाईकांनी तिचा परिसरात शोध घेतला. मात्र पीडित मुलगी कुठेही आढळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने आपल्या अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याची तिच्या नातेवाईकांची खात्री झाली. त्यानंतर त्यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्या प्रमाणे राहुरी पोलीस ठाण्यात अज्ञात इसमा विरोधात अपहरणचा गुन्हा दाखल करण्यात आला.

### आ. गडाख संत-महंताचा सन्मान जपणारे नेतृत्व

**नेवासा :** तालुक्यातील गावागावातील संत-महंतांच्या पाठीशी आ. शंकरराव गडाख हे नेहमी उभे राहतात. कथा, कीर्तन,विविध सप्ताह यांची मोठी परंपरा नेवासा तालुक्याला लाभलेली आहे. त्या परंपरेला आत्मियतेने बळ देण्याचे काम आ. गडाख नेहमी करतात, याचा विशेष अभिमान आहे.समाजजागृतीचे काम संत-महंत आपल्या वाणीने व कार्याने करतात. या कार्यात त्यांना समाजाचे व नेतृत्वाचे सहकार्य लाभल्याने संतांचे कार्य अखंड सुरू राहते. आ. गडाख संत-महंत यांचा सन्मान जपत धार्मिक कार्याला पाठबळ देणारे नेतृत्व असल्याचे गौरवोद्गार ढोक यांनी काढले.

### घरफोडीतील संशयित आरोपी ताब्यात

**श्रीरामपूर :** शहरातील वॉर्ड नं. ७, परिसरात बँक अधिकारी रवींद्र हरकल यांच्या घरी झालेल्या घरफोडीचा पोलिसांनी तपास करून दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. हरकल हे ईदनिमित्त गुरुवारी रात्री मित्राच्या घरी गेले होते. चोरट्यांनी घर बंद असल्याचे हेरून १५ ते २० मिनिटांत घराचा कडी- कोंडा व कुलपे तोडून घरातील दहा हजार रोख रक्कम तसेच सोन्याचे दागिने असा सुमारे दोन लाखांचा ऐवज चोरून नेला होता. सीसीटीव्हीच्या फुटेजवरून व पळालेला आरोपीच्या वर्णनावरून पोलिसांनी दोघा संशयितांना ताब्यात घेतले आहे.

# अर्ज दाखल करण्यापूर्वीच महसूल यंत्रणेचा ससेमीरा

## ■ नीलेश लंके यांचा आरोप ■ विखे यांच्याकडून सत्तेचा गैरवापर

**निघोज : प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणूकीचा अर्ज दाखल करण्यापूर्वीच विखे-पिता पुत्रांनी आपल्या मागे महसूल यंत्रणेचा ससेमीरा लावला असून हा सत्तेचा गैरवापर असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार नीलेश लंके यांनी केला. शासकीय अधिकारी चोविस तास व्हिडीओ कॅमेरे घेऊन आपल्या पाठीमागे ठेवण्यात येत असल्याचे लंके म्हणाले. नीलेश लंके यांना राजकीय प्रवाहात ठेवायचे की बाहेर काढायचे याचा अधिकार पारनेरच्या जनतेला आहे, विखे यांना नाही असेही लंके यांनी यावेळी ठणकावून सांगितले.**

लंके यांची स्वाभिमान जनसंवाद यात्रा सोमवारी सायंकाळी निघोजमध्ये पोहचल्यानंतर झालेल्या सभेत लंके हे बोलत होते. ते म्हणाले, पारनेरची जनता स्वाभिमानी आहे. पारनेरचा खासदार म्हणजे तालुक्यातील प्रत्येक व्यक्ती खासदार असल्याचा अभिमान प्रत्येकाला असणार आहे. मतदारसंघातील प्रत्येक



तालुक्यात स्वाभिमान यात्रेला उस्फुर्त प्रतिसाद मिळाला आहे. कर्जत-जामखेडच्या कार्यकर्त्यांनी मतदारसंघात सर्वाधिक मताधिक्य देण्याचा शब्द दिला आहे. असे असताना आपण कर्जत जामखेडच्या मागे पडलो तर ते योग्य होणार नाही. पारनेर तालुक्यातील सर्वपक्षीय कार्यकर्ते आपल्यासोबत आहेत.

जनता जनार्दनाचा आशिर्वाद आपल्या पाठीशी असल्याने एक लाखांपेक्षा अधिकचे मताधिक्य आपणास तालुक्यातून मिळाले पाहिजे अशा पध्दतीने नियोजन करण्याचे आवाहन लंके यांनी केले.

विखे परिवाराने पारनेर तालुक्यातील जनतेसाठी काय दिले याचे उत्तर त्यांनी द्यावे. आम्ही मंजुर करून आणलेली कामे आडवून तालुक्याच्या विकासाला ब्रेक लावण्याचे पाप विखे यांच्याकडून करण्यात येत असून विखे यांच्याऐवढा लबाड पुढारी कोणी पाहिला नाही.

दादा कळकमर म्हणाले, नीलेश लंके यांची उमेदवारी ही पारनेर तालुक्याची अस्मिता आहे. त्यामुळे पारनेर तालुका त्यांना सर्वाधिक मताधिक्य देणार आहे.सन २०१९ च्या निवडणूकीत आमदार संग्राम जगताप यांनी नगर शहरात विखे यांना ५५ हजारांची आघाडी देऊन मिलिभगत केल्याचा आरोपही कळमकर यांनी केला.

यावेळी नितीन अडसूळ, अर्जुन भालेकर, सुदाम पवार, शिवाजी जाधव, बाळासाहेब पुंडे, दत्तात्रय म्हस्के, शिवाजी लंके, बाळासाहेब लंके, दिलीप ढवण, मंगेश लंके, विश्वास शेटे, विकास शेटे, सुनील वराळ, शांताराम लाळगे, वसंत ढवण, दत्तात्रय लंके, सचिन लंके, सोन्याबापू भापकर, किसन रासकर, डॉ. आबासाहेब खोडदे, सुवर्णा धाडगे, शिवाजी औटी, बाळासाहेब दिघे, राजू आघाव, खंडू भुकन, बाबाजी तनपुरे, राहुल सुकाळे, ठकाराम लंके, रूपेश ढवण यांच्यासह मोठया संख्येने कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. प्रा. ज्ञानेश्वर कवाद व सोमनाथ वरखडे यांनी सुत्रसंचलन केले.

### अबकी बार एक लाख पार !

**सन १९९९ मध्ये स्व. गुलाबराव शेळके यांनी मा. खा. स्व. बाळासाहेब विखे यांच्या विरोधात उत्तरेतून लोकसभेची निवडणूक लढविली. त्यावेळीही तालुक्यातील जनतेने त्यांना साथ दिली. आता नीलेश लंके हे दक्षिण लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवित असून या मतदारसंघातील श्रीगोंदे, कर्जत, जामखेड, राहुरी, नगर शहर तसेच पारनेर-नगर मतदारसंघ हे तालुके शरद पवार यांना मानणारे तालुके आहेत. नीलेश लंके यांचा राज्यात संपर्क असून कोरोना काळात त्यांनी जीवावर उदार होउन केलेले काम हीच त्यांची ओळख आहे. संपूर्ण जिल्हयात त्यांचा व्यक्तीगत संपर्क आहे. लंके यांना विधानसभा निवडणूकीत साठ हजारांचे मताधिक्य मिळाले होते. तालुक्याची अस्मिता म्हणून लोकसभा निवडणूकीत लंके यांना एक लाखांहून अधिकचे मताधिक्य द्यावे असे आवाहन करताना दादा कळमकर यांनी अब की बार मताधिक्य एक लाख पार असा नारा दिला. टाळयांच्या कडकडाडात उपस्थितांनी कळमकरांच्या घोषणेस प्रतिसाद दिला.**

# विखेंवर आरोपांचे बाण सोडत निष्ठावंताचा राजीनामा

## भाजपा ४०० पार असेल ; पण त्यात नगरची जागा नसेल !

**शेवगाव : प्रतिनिधी**

**सध्या लोकसभेची रणधुमाळी सुरू असून उमेदवार आरोप प्रत्यारोप करताना पाहायला मिळतात. राज्यातील सर्वात मोठा पक्ष असलेल्या भारतीय जनता पक्षाने लोकसभा निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. पण गेल्या काही वर्षांमध्ये पक्षात झालेल्या इनकमिंगमुळे निष्ठावंतांवर अन्याय होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्याची प्रचिती आता नगर दक्षिण मतदारसंघात आली आहे. पक्षासाठी ४५ वर्षे राबलेल्या पदाधिकाऱ्यानं राजीनामा दिला आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंना पाठवलेल्या पत्रात त्यांनी विखे पाटील कुटुंबावर, विशेषत: खासदार सुजय विखेंवर गंभीर आरोप केले आहेत.**



महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांनी खासदार असताना कधीही शेवगावच्या नागरिकांच्या सुविधांकडे लक्ष दिलं नाही. तसंच निवडून आल्यानंतर पाच वर्षांमध्ये त्यांनी शेवगावच्या नागरिकांशी संवाददेखील साधला नसल्याचा आरोप करत शेवगाव येथील भाजपचे सुनील रामचंद्र रासने यांनी त्यांच्या पदांचा राजीनामा दिला आहे. रासने यांनी भाजपचे शेवगाव सरचिटणीस, शहर उपाध्यक्ष, तालुका उपाध्यक्ष, तालुका सरचिटणीस अशी अनेक महत्त्वाची पदं भूषवली आहेत. अनेक वर्षापासून ते भाजपाचे कार्यकर्ते आहेत. त्यांचे वडील रामचंद्र ससाने यांनी कारसेवेमध्ये देखील सहभाग नोंदवलेला आहे.

रासने यांनी प्रदेशाध्यक्षांना लिहिलेल्या पत्रातून खदखद व्यक्त केलेली आहे. गेल्या पाच वर्षात कधी त्यांनी (सुजय विखेंनी) मतदारसंघात ढुंकून देखील पाहिलं नाही. नागरिकांचे फोन न उचलणं, पार्टी म्हणजे मी आणि मी म्हणजेच मतदार संघातील जनता असा समज करून घेतल्यानं त्यांना आपला पराभव दिसत आहे. त्यामुळे डाळ व साखर वाटण्याचं काम त्यांनी केलं. परंतु डाळ व साखर वाटण्याऐवजी गुळासारखे गोड राहून मतदारांशी संवाद साधला असता तर ही वेळ आली नसती, असा खोचक टोला रासने यांनी लगावला आहे.


महसूल विभागातील जनतेच्या सेवादेखील पैसे घेतल्याशिवाय सुटत नाहीत. पाच वर्ष मतदारांशी संबंध न जपणारे खासदार हे निवडणुकीच्या काळामध्ये नागरिकांना साखर व डाळ वाटणे, मतदार संघातील महिलांसाठी शिर्डी व शनिशिंगणापूर दर्शन, लहान मोठे सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन मतदारांशी संवाद साधण्याचा केविलवाणा प्रयत्न विखे परिवार करत असल्याचा आरोप रासने यांनी केला आहे.पदाधिकाऱ्यांचा कार्यकर्त्यांचा भ्रमनिरास झाला आहे. भारतीय जनता पार्टीशी संबंधित संघटना, मग त्यात संघाचे कार्यकर्ते असतील, विश्व हिंदू परिषद असेल, बजरंग दल असेल, दुर्गावाहिनी असेल, पक्षाच्या रचनेमधील सगळे पदाधिकारी असतील, बूथप्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख असतील, पन्नाप्रमुख असतील, यांची आठवण फक्त पाच वर्षांनी होते. शिस्तीच्या पार्टीत आपण बरं बोलण्यापेक्षा खरं बोलणं गरजेचं आहे, असा उल्लेख पत्रात आहे.

निवडणुकीच्या अगोदरच विखेंच्या पराभवाची चिन्हं दिसत आहेत. भाजप ४०० जागा पार करेल. परंतु त्यात नगर दक्षिणची जागा नसणार याचं दु:ख मतदारसंघात प्रत्येक कार्यकर्त्याला वाटत आहे. फक्त पैसा, दंडेलशाही यामुळे उघडपणे कोणी बोलण्यास तयार नाही. नगर दक्षिण मतदारसंघातील भाजपच्या हजारो निष्ठावंतांची भावना मी प्रातिनिधिक स्वरुपात मांडत असल्याचं उल्लेख रासने यांनी पत्राच्या शेवटी केला आहे.

# रामनवमी : पूजा,विधी आणि महत्व

रामनवमीचे पर्व भगवान श्रीरामाच्या जन्मोत्सवाच्या रूपात साजरा केले जाते. वाल्मिकी रामायणानुसार भगवान श्री रामाचा जन्म चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षाच्या नवमीला, कर्क लग्नात आणि अभिजात मुहूर्तावर झाला होता. रामनवमीचा चैत्र महिन्यातील नवरात्रीचा अखेरचा दिवस असतो. रामनवमी फक्त भारताच नाही तर जगभरात साजरी केली जाते.

पंचांगानुसार चैत्र महिन्यातील नवमी तिथीचा प्रारंभ १६ एप्रिलला मंगळवारी दुपारी १ वाजून २३ मिनिटांनी होईल आणि नवमी तिथी १७ एप्रिलला दुपारी ३ वाजून १५ मिनिटांपर्यंत असेल. उदया तिथीत नवमी तिथी असल्याने रामनवमी १७ एप्रिलला साजरी होईल. १७ एप्रिलला पूर्ण दिवस रवी योग असणार आहे.



भगवान श्रीरामाची कृपा व्हावी यासाठी या दिवशी रामायण पाठ आणि राम रक्षा स्तोत्र यांचे पठण करावे. असे केल्याने जीवनात सुखसमृध्दी राहील. या दिवशी भगवान श्रीरामाच्या मंदिरात जाऊन तिथे पिवळ्या रंगाचे वस्त्र अर्पण करावे. तसेच पिवळ्या रंगाच्या फुलांचा हार अर्पण करावा.

घरी रामनवमीची पूजा कशी करावी?

जर मंदिरात जाणे शक्य नसेल तर घरीही पूजा करता येते.पूजेसाठी सर्वात आधी लाकडी चौरंग घ्या.यावर लाल रंगाचे वस्त्र ठेवा.त्यानंतर भगवान श्रीराम, लक्ष्मण, माता सीता, हनुमान यांच्या मूर्ती गंगाजलाने शुद्ध करून चौरंगावर स्थापित कराव्यात.मग चंदनाचा टिळा लावावा.त्यानंतर अक्षता, फूल अशी पूजेची सामग्री अर्पण करावी.मग तुपाचा दिवास लावून रामरक्षा स्तोत्र, श्रीराम चालिसा आणि रामायणातील श्लोकांचे पठण करावे.

SACCHIDANAND CAREER INSTITUTE
Parner Public School
G.M INTERNATIONAL SCHOOL PARNER
ADMISSIONS OPEN 2024-25
प्रवेश सुरू २०२४-२५
PARNER PUBLIC SCHOOL
LKG, UKG, STD 1st
State Board
11th Science [State Board & NCERT Syllabus]
Integrated with NEET & MHT-CET
MHT-CET (Engg., NATA, Architecture, NDA, Other Entrance)
NEET (Medical, Agri, Pharmacy, Other Entrance)
G. M. INTERNATIONAL SCHOOL
LKG, UKG, STD 1st to 5th
CBSE Board

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2



डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच



मेजर भगवान नांगरे सर
* आमची वैशिष्ट्ये *
* १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
* एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
* प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
* मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
* अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
* PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
* पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
* ॲडमिशन ओपन *
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# चित्तथरारक लढतींनी गाजला कुस्त्यांचा आखाडा

## बनाईदेवी यात्रोत्सवानिमित्त टाकळी ढोकेश्वरला हगामा



**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**कसलेल्या पैलवानांकडून एकमेकांवर टाकण्यात येणारे डाव, प्रतीडाव, क्षणा क्षणाला बदलणारे लढतीचे चित्र आणि डोळ्यांची पापणी लवताच लागलेल्या लढतीचा निकाल अशा अनेक चित्तथरारक लढतींनी टाकळी ढोकेश्वर येथे आयोजित करण्यात आलेल्या कुस्त्यांचा जंगी हगामा गाजला.**

टाकळी ढोकेश्वर येथील ग्रामदैवत बनाईदेवी यात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कुस्त्यांच्या आखाड्यात राज्यासह परराज्यातील पैलवानांनी हजेरी लावली होती. वैयक्तिक कुस्त्यांबरोबरच अनेक प्रेक्षणीय कुस्त्यांनी कुस्ती शौकीनांच्या डोळ्याचे पारणे फेडले.

दुपारी चार वाजण्याच्या सुमारास नीलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, उपसरपंच रामभाऊ तराळ, जयसिंग झावरे, भाऊसाहेब झावरे, शरद झावरे, अंकुश पायमोडे यात्रा कमिटीचे अध्यक्ष विक्रम झावरे, उपाध्यक्ष सुनील चव्हाण, पत्रकार वसंत रांधवण, खजिनदार मळिभाऊ रांधवण, संपतराव तराळ, गंगाधर बांडे, प्रकाश इघे, बंडू रांधवण, युवक संघटक बबलू झावरे, संजय खिलारी मेजर, विलास धुमाळ, आदी मान्यवरांच्या हस्ते नारळ वाढवून कुस्त्यांच्या हगाम्यास प्रारंभ झाला.

टाकळी ढोकेश्वर गावाला पुर्वीपासूनच कुस्तीची परंपरा आहे.तालुक्यातील यात्रा उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या गुढीपाडव्याच्या नंतर यंदाच्या हंगामातील पहिल्याच हगामा असल्याने अनेक नामवंत पैलवान या हगाम्यासाठी दरवर्षी हजेरी लावतात. प्रेक्षणीय लढती पाहण्याची पर्वणी मिळणार असल्याने कुस्ती शौकीन टाकळी ढोकेश्वरच्या हगाम्यास आवर्जून हजेरी लावतात.

# दोन लाखांच्या मताधिक्याने नीलेश लंके खासदार होणार

## उद्योजक शिवाजीराव लंके यांचा विश्वास

**निघोज : प्रतिनिधी**

**अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात जनसंवाद यात्रेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असून खासदार म्हणून नीलेश लंके यांचा दोन लाख मताधिक्याने विजय होणार असल्याचा विश्वास लंके यांचे कट्टर सहकारी व किशन कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा शिवाजीराव लंके यांनी व्यक्त केला.**



निघोज येथील मेळावा व नियोजन बैठकीची माहिती देताना ते बोलत होते. लंके यावेळी म्हणाले आमदार म्हणून काम करताना त्यांनी जिल्ह्यातील जनतेच्या संपर्कात राहून सामाजिक कामे मोठ्या प्रमाणात मार्गी लावली आहेत. सामाजिक कामांच्या माध्यमातून त्यांचा राज्यात नावलौकिक आहे.

गेली पंधरा दिवसांपासून जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून लोकसभा मतदारसंघात प्रत्येक विधानसभा मतदारसंघात संपर्क होऊन मतदारांनी भरभरून प्रतिसाद दिला असून जनतेच्या प्रतिक्रिया सकारात्मक असून नीलेश लंके हे दोन लाख मताधिक्याने विजयी होऊन विरोधी उमेदवार विद्यमान खासदार डॉ सुजय विखे पाटील यांना चारी मुंड्या चित करतील व दिल्लीत खासदार म्हणून जातील अशी खात्री लंके यांनी व्यक्त केली.

# विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करीत चिमुकल्या रेवाचा वाढदिवस साजरा

## उनवणे परिवाराने जपली सामाजिक बांधिलकी

**निघोज : प्रतिनिधी**

**शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रोहन दत्तात्रय उनवणे व स्वरांजली या गृहउद्योग समूहाच्या अध्यक्षा सरला रोहन उनवणे यांची चार वर्षाची रेवा या चिमुकलीचा वाढदिवस अतिशय साध्या पद्धतीने पारनेर तालुक्यातील निघोज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडी या ठिकाणी साजरा करण्यात आला यावेळी उनवणे कुटुंबाच्या वतीने २०० विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.**

मुख्याध्यापक कैलास शिंदे, मगर सर, काळे सर, अनिता दिघे मॅडम, विद्या सालके मॅडम तसेच अंगणवाडी सेविका संगिता लंके, बेबीताई सोनवणे, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, सदस्य व प्रेस फोटोग्राफर जयसिंग हरेल आदी उपस्थित होते.



यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रोहन उनवणे यांनी सांगितले की जिल्हा परिषद शाळांचा शैक्षणिक स्तर अतिशय उंचावलेला आहे ही सर्वसामान्य जनतेसाठी आनंददायी व अभिमानाची बाब आहे. लहान मुलांचा वाढदिवस साजरा करताना त्याचा आनंद जिल्हा परिषद व अंगणवाडी शाळेतील मुलांना झाला पाहिजे या हेतूने आम्ही रेवाचा वाढदिवस जिल्हा परिषद व अंगणवाडी शाळेत साजरा केला आहे.

स्वरांजली गृह उद्योग समूहाच्या अध्यक्षा सरला उनवणे यांनी सांगितले की गेली चार वर्षांपासून आम्हाला जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडी शाळेतील शैक्षणिक दर्जाचा अनुभव मिळाला आहे.अतिशय गुणवत्ता धारक शिक्षक या ठिकाणी कार्यरत असून गणित इतिहास, सामाजिक अभ्यास या विषयांचे प्रगत ज्ञान व इंग्रजी व मराठी या विषयावर प्रभुत्व असणारे शिक्षक या ठिकाणी कार्यरत आहेत निघोज व परिसरातील सर्वच जिल्हा परिषद मराठी शाळांचा दर्जा अतिशय उंचावलेला असून प्रत्येक शालेय स्पर्धेत या शाळांतील विद्यार्थी जिल्हा स्पर्धेत अद्वितीय कामगिरी करीत असून काहीना काही सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून आनंदी असला पाहीजे ही भावना ठेवून रेवाचा वाढदिवस साजरा केला असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले.यावेळी मुख्याध्यापक कैलास शिंदे तसेच सहकारी शिक्षक व शिक्षिका यांनी या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

# डॉ. आंबेडकरांनी एकोपा, प्रेम, सद्भावना शिकवली : उबाळे

## आरपीआयच्या वतीने पारनेर मध्ये डॉ. आंबेडकर यांना अभिवादन



**पारनेर : प्रतिनिधी**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटना तयार करून जगातील सर्वश्रेष्ठ लोकशाही निर्माण केली. त्यामुळे समाजामध्ये एकोपा, प्रेम, सद्भावना निर्माण झाली आहे, प्रत्येक नागरिकाला समान अधिकार मिळाला असून संविधानामुळे देशाच्या विकासाला गती प्राप्त झाली आहे. त्यांच्या स्मृती आम्हाला सगळ्यांना आयुष्यभर समाधान आणि देशासाठी काम करण्याची प्रेरणा देते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा मंत्र दिला होता. असे मत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पारनेर तालुका अध्यक्ष राजेंद्र उबाळे यांनी व्यक्त केले.**

पारनेर शहरामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले यावेळी उबाळे बोलत होते.पारनेर शहरातील आंबेडकर भवन येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले गट) वतीने भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी आरपीआयचे पारनेर तालुका अध्यक्ष राजेंद्र उबाळे, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब नगरे, सुभाषराव नगरे, पारनेर शहर अध्यक्ष प्रदीप नगरे, युवा नेते राजुभाऊ नगरे, युवा नेते रोहन नगरे, संजिवन सोनवणे, पारनेर तालुका उपाध्यक्ष राजेश साठे, किरण खुपटे, संतोष शिंदे, दर्शन गायकवाड, आदेश गायकवाड, नितिन भालेराव, तुषार साळवे, किशोर बागुल, हर्षद घोडके, मयुर उबाळे, शुभम साळवे, सुनिल गाडे, संतोष उबाळे आदी यावेळी उपस्थित होते.

# टाकळी ढोकेश्वर येथे डॉ.आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

## बुद्ध विहारामध्ये पुतळ्यास अभिवादन

**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ जयंती टाकळी ढोकेश्वर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. टाकळी ढोकेश्वर येथील बुद्ध विहारामध्ये बौद्ध बांधव तसेच ग्रामस्थ यांच्याकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व गौतम बुद्ध पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तसेच त्यांना अभिवादन करून त्यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित आपले मनोगत व्यक्त केले.**

याप्रसंगी टाकळी ढोकेश्वरच्या सरपंच अरुणाताई खिलारी, माजी सरपंच सुनीता झावरे, उपसरपंच किरण तराळ, सुनील चव्हाण, रावसाहेब झावरे, प्रदीप खिलारी,कुसकर सर , प्रकाश इघे,अंकुश पायमोडे ,विक्रम झावरे, दीपक साळवे, शिवाजी गायकवाड,श्रावण गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य किशोर गायकवाड, परमेश्वर गायकवाड ,मंथन गायकवाड ,योहान गायकवाड, दर्शन गायकवाड, प्रकाश गायकवाड, यांच्यासह बौद्ध बांधव तसेच ग्रामस्थमोठ्या संख्येने उपस्थित होते.



**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिशा देण्यासाठी संविधान दिले आज हे संविधान धोक्यात येण्याची चिन्हे आहेत तरी सर्वांनी संविधान टिकले पाहिजे यासाठी प्रयत्न करावे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाचा प्रत्येकाने आदर्श घ्यायला पाहिजे.**

**रावसाहेब झावरे,सर**

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना श्रावण गायकवाड यांनी सांगितले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान ही भारतातील सर्वोच्च संपत्ती आहे.तसेच हे संविधान टिकवण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने प्रयत्न केले पाहिजे व या संविधानाचा आदर राखला पाहिजे असेही ते म्हणाले.

# डॉ. बाबासाहेबांनी समाजातील अस्पृश्यता नष्ट केली

## ■ सुजित झावरे पाटील यांचे प्रतिपादन ■ माळकुप येथे डॉ. आंबेडकर यांची १३३ वी जयंती साजरी

**माळकुप : प्रतिनिधी**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील अस्पृश्यता नष्ट करत सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा विचार दिला, त्यांनी संविधान दिलं. बाबासाहेब आंबेडकर यांनी दीनदलित दुबळ्यांसाठी भरीव सहकार्य केलं त्यांच्या स्मृती आपल्या सगळ्यांना आयुष्यभर समाधान आणि देशासाठी समाजासाठी काम करण्याची प्रेरणा देतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा मंत्र दिला होता. त्यानुसार आजची तरुणाई शिक्षणासह सर्वच क्षेत्रात आपलं वेगळा ठसा उमटवित असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजितराव झावरे पाटील यांनी व्यक्त केले.**

माळकुप येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ व्या जयंती निमित्ताने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच जिल्हयातील सर्वात मोठा ध्वजाचे संविधान चौकात ध्वजारोहण सुजित झावरे पाटील यांचे



हस्ते करण्यात आले.
पुढे बोलताना झावरे म्हणाले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटना तयार करून जगातील सर्वश्रेष्ठ लोकशाही निर्माण केली. त्यामुळे समाजामध्ये एकोपा, प्रेम, सद्भावना निर्माण झाले आहे, प्रत्येक नागरिकाला समान अधिकार मिळाला असून संविधानामुळे देशाच्या ग्रामीण विकासाला गती प्राप्त झाली आहे. यावेळी राजेंद्र करंदीकर, बाळासाहेब पातारे, उपसरपंच राहुल घंगाळे, सुदाम शिंदे, चेअरमन मधुकर शिंदे, नंदु कदम, धनंजय साठे, सतीश गायकवाड, पद्माकर पंडीत, आकाश शिंदे, भाऊ गजरे, पिनू आंबेडकर, पिनू गायकवाड, अर्जुन लष्करे, सुरेश रोकडे, किरण सोनवणे, अविनाश देशमुख, सुनिल चौधरी, आदित्य करंदीकर, सिद्धार्थ सातपुते महिला, युवक वर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# न्यू इंग्लिश स्कूलच्या सोंडकर,सोबले, शिंदे यांना एनएमएमएस शिष्यवृत्ती

## ४२ विद्यार्थी सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयात एनएमएमएस परीक्षेत बसलेल्या ८६ विद्यार्थ्यांपैकी ५४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ३ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी प्राप्त झाली आहेत व ४२ विद्यार्थी हे सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले असल्याची माहिती प्राचार्य बाळासाहेब करंजुले यांनी दिली आहे.**



पारनेर येथील इंग्लिश स्कूल विद्यालयात नेहमीच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेकडे लक्ष दिले जाते त्यांना विविध स्पर्धा परीक्षांमध्ये तयारी कशी केली जाईल या संदर्भात मार्गदर्शन केले जाते. नुकत्याच झालेल्या एनएमएमएस परीक्षेसाठी ८६ विद्यार्थी विद्यालयातून परीक्षेत बसले होते त्यातील ५४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असल्याने व त्यातील गौरी राहुल सोंडकर, सुयश संतोष सोबले,अनुष्का नंदू शिंदे या इयत्ता आठवीत शिकणारे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले असून त्यांना शिष्यवृत्ती मिळणार आहे.

या विद्यार्थ्यांना प्राचार्य बाळासाहेब करंजुले,पर्यवेक्षक बाबासाहेब चौरे व एनएमएसएस विभाग प्रमुख सुजाता गुंड, वैशाली सालके, कुसकर मॅडम यांनी मार्गदर्शन केले. या परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेच्या पदाधिकारी शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य व पालक यांनी अभिनंदन केले आहे.



# वडगाव सावताळ येथे स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान

**वडगाव सावताळ : प्रतिनिधी**

**शिक्षणातील गुणवत्ता हीच विद्यार्थी घडवत असते ग्रामीण भागामध्ये आज अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून विविध शासकीय पदांवर काम करत आहेत. नुकतीच उपजिल्हाधिकारी पदावर निवड झालेले विकास कर्डिले (नेवासा) व कॅनरा बँकेत असिस्टंट मॅनेजर म्हणून निवड झालेले सनी मोरे (टाकळी ढोकेश्वर, पारनेर) यांचा वडगाव सावताळ ग्रामस्थ व भाऊसाहेब शिंदे प्रतिष्ठान वडगाव सावताळ यांच्या वतीने सत्कार व सन्मान करण्यात आला.**

### स्पर्धा परिक्षा विद्यार्थ्यांसाठी व्यासपीठ

**ग्रामीण भागामध्ये अनेक विद्यार्थी हे स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून तयारी करत असतात त्या माध्यमातून ते विविध पदांवर निवडले जातात. स्पर्धा परीक्षा ही खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांना व्यासपीठ देत असते. अमोल कर्डिले व सनी मोरे या विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश हे स्पर्धा परीक्षा करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे ठरणार आहे.**

**भाऊसाहेब शिंदे**
**मा. सरपंच वडगाव सावताळ**

यावेळी वडगाव सावताळ येथील राजेंद्र रोकडे, मंगेश रोकडे, नवनाथ रोकडे (उद्योग निरीक्षक महाराष्ट्र राज्य) शुभम रोकडे, विकास भानगडे, कुणाल शिंदे, शुभम चौधरी, संजय भनगडे, दीपक शिंदे व वडगाव सावताळ येथील ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com